दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ८५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 15 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 85 | Pages 4 | Rate 4 Rs

### राहुल गांधींनी विकासाचा मुद्दाच मांडला नाही

**मुंबई–** चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, बिहारची जनता ही विकासाच्या बाजूने आहे. त्यांना डबल इंजिन सरकारवर संपूर्ण विश्वास आहे. हे सरकार बिहारचा विकास करु शकते म्हणून जनतेने विश्वास दाखवत एनडीएला मतदान केले आहे. आश्वासन पाळणारा पक्ष म्हणून जनतेने बिहारमध्ये आम्हाला मतदान केले आहे. मतदार यादीमध्ये अनेकांची नावे दुबार आहे ती बदलली गेलीच पाहिजे. पण राहुल गांधींनी जे मतचोरी म्हटले तसे काहीच नाही. राहुल गांधी यांनी कधीही विकसीत बिहारचा मुद्दा घेतला नाही, पण एनडीएकडून मात्र कायम विकसीत बिहारच्या मुद्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, त्यासाठी जनतेने एनडीएला कौल दिला आहे.

# बिहारच्या जनतेने लालूंचे जंगलराज नाकारले

## एकनाथ शिंदे यांनी मानले लाडक्या बहिणींचे आभार



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विजयाबद्दल लाडक्या बहिणींचे आभार मानले आहेत. लाडक्या बहिणींनी हिरीरीने मतदान केल्यामुळेच बिहारमध्ये एनडीएचा लँडस्लाईड विजय झाला, असे ते म्हणालेत. बिहारच्या जनतेने या जनादेशामुळे लालूंचे जंगलराज नाकारल्याचेही ते यावेळी म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही हा विजय खरोखर ऐतिहासिक असल्याचे म्हटले आहे.बिहार विधानसभा निवडणुकीत राजद व काँग्रेसच्या महाआघाडीचा पार धुव्वा उडाला आहे. तर सत्ताधारी एनडीएचा ऐतिहासिक विजय झाला आहे. यामुळे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वातील एनडीएचे सरकार सलग पाचव्यांदा येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एनडीएच्या या विजयात बिहारमधील महिलांना निवडणुकीच्या तोंडावर प्रत्येकी १० हजार रुपयांच्या करण्यात आलेल्या मदतीचा मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. विशेषतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्याची पुष्टी केली आहे. लाडक्या बहिणींमुळेच बिहारमध्ये भाजपला दैदिप्यमान विजय मिळाल्याचे ते म्हणालेत.

शिंदे म्हणाले, पूर्वी लोक घोषणा द्यायचे की, जब तक रहेगा समोसे में आलू, तब तक बिहारमध्ये रहेगा लालू. पण आता असे झाले आहे की, जब तक रहेगा आलू तब तक रहेगा विकास का राज चालू. बिहारच्या लाडक्या बहिणींनी विकासाला महत्त्व दिले आहे. त्यामुळे तिथे विकासाची राजवटच सुरू राहील. लोकांनी लालूंचे जंगलराज नाकारले. बिहारमध्ये लालू प्रसाद यादव यांचे सरकार होते तेव्हा जनतेची सायंकाळी ६ वाजेनंतर रस्त्यावर फिरण्याची हिंमत होत नव्हती. व्यापारी आपली दुकाने बंद करत होते. मी बिहारमध्ये प्रचाराला गेलो तेव्हा लोक तेथील जंगलराजविषयी सांगत होते. तिथे दिवसाढवळ्या हत्या, लूट व बलात्कार होत होते. पण नितीशकुमार यांच्या काळात हे सर्व चित्र बदलले. त्यामुळे त्यांना धन्यवाद देतो.

### खरोखर ऐतिहासिक विजय–अजित पवार



**सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बिहारमधील एनडीएचा विजय ऐतिहासिक असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले, बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) मिळवलेला विजय हा खरोखरच ऐतिहासिक असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वावरील जनतेच्या विश्वासाचं प्रतीक आहे.बिहारमध्ये एनडीए सरकारनं समाजकल्याणाच्या विविध क्रांतिकारी आणि जनहितैषी योजना प्रभावीपणे राबवल्या. विशेषतः राज्यातील लाडक्या बहिणींनी मोठ्या संख्येने दिलेला पाठिंबा हा या विजयाचा महत्त्वपूर्ण आधार आहे. बिहारच्या जनतेनं डबल इंजिन सरकारच्या कार्यप्रणालीवर पुन्हा एकदा भक्कम विश्वास प्रकट करून भरघोस बहुमतानं समर्थन दिलं आहे. या अभूतपूर्व विजयाबद्दल बिहारमधील एनडीएच्या सर्व घटक पक्षांचं मी मनापासून अभिनंदन करतो.**

### लाडक्या बहिणींमुळे एनडीएचा विजय

**एकनाथ शिंदे म्हणाले, बिहारमध्ये एनडीएचा मोठा विजय झाला. तेथील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला. मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बिहारमध्ये केलेल्या विकासावर विश्वास ठेवला. त्यामुळे मी त्यांचेही मनापासून अभिनंदन करतो. एवढेच नाही तर मी लाडक्या बहिणींचेही अभिनंदन करतो. कारण, लाडक्या बहिणींनी तिथे मोठ्या प्रमाणात मतदान केले. महाराष्ट्रात लाडक्या बहिणींचे मतदान वाढल्यामुळे लँडस्लाईड व्हिक्ट्री मिळाली. तशीच लँडस्लाईड व्हिक्ट्री बिहारमध्ये लाडक्या बहिणींमुळे मिळाली. बिहारच्या जनतेने जंगलराज नाकारले आणि विकासराज स्वीकारले. त्यामुळे एनडीएला अशा प्रकारचा विजय मिळाला.**

### विरोधकांना सुबुद्धी आली पाहिजे

**आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकार्याने बिहारमध्ये डबल इंजिनचे सरकार विकासाचे काम पुढे नेईल. मतदारांनीही डबल इंजिनच्या सरकारवर विश्वास दाखवला आहे. विशेष म्हणजे बिहारमधील एसआयआर नंतरचा हा पहिला विजय आहे. याचा अर्थ निवडणूक प्रक्रियेत पूर्णतः पारदर्शकता आली. पण त्यानंतरही हे विरोधक त्यावर टीका केल्याशिवाय राहणार नाही. त्यांचे काम टीका करण्याचे आहे. आता तरी त्यांचे डोळे उघडले पाहिजेत. त्यांना सुबुद्धी आली पाहिजे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.**

## आंतरमहाविद्यालयीन थलेटिक्स स्पर्धेत वैद्यनाथ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश



दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

बीड येथील बंकटस्वामी महाविद्यालयाच्या मैदानावर दि.१२ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या आंतरमहाविद्यालयीन थलेटिक्स स्पर्धेत परळी येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन संपादन केले आहे.

यामध्ये १०० मी.धावणे प्रथम पवार ओम,१५०० मी.धावणे प्रथम डुकरे ओम ४ह्न४०० रीले मी. धावणे प्रथम शुभम चव्हाण,पवार ओम,गुट्टे गोपाल,डुकरे वैभव,२०० मी.धावणे द्वितीय श्रुती बीडगर,८०० मी, धावणे तृतीय बदने माणीक,१०० मी.धावणे तृतीय चहाण धनश्री, ४०० मी.धावणे तृतीय गवळी दिव्या या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.सर्व खेळांडूचे अभिनंदन प्राचार्य डॉ.जे.व्ही.जगजकर उपप्राचार्य,संस्थेचे पदाधिकारी,क्रिडाविभाग प्रमुख डॉ.पी.एल.कराड,शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ.व्ही.व्ही, बेंडसुरे प्रा.विजय मुंडे यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना साई अकॅडमीचे रमेश चव्हाण यांनी प्रशिक्षण दिले.

## सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को. प्राईड–२०२५ पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ चा प्रतिष्ठेचा व मानाचा पुरस्कार जाहीर झाला.याबद्दल कारखाना चेअरमन, व्हा.चेअरमन, कार्यकारी संचालकांसह कारखाना प्रशासनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वर्ल्ड व कॉसमॉस को. ऑपरेटिव्ह बँक लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या संस्था,व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.त्याप्रमाणे या वर्षीचा जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ठ योगदानाबद्यल दिला जाणारा ग्रीन वर्ल्ड को. प्राईड–२०२५ हा पुरस्कार तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर कारखान्यास नुकताच घोषीत झाला.तसे पत्र ग्रीन वर्ल्ड पब्लीकेशनच्या वतीने सोळंके कारखान्यास कळविले असल्याची माहिती चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी दिली. ते म्हणाले की, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करताना ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर, साखर उत्पादनातील गुणवत्ता, उत्पादन खर्चातील सुव्यवस्था आणि कारखाना व्यवस्थापनातील पारदर्शकता यांचा उत्तम संगम साधला आहे. त्याचबरोबर कारखान्याच्या व्यापक विकासासाठी इथेनॉल उत्पादन, को. जनरेशन प्रकल्प (बिज उत्पादन), प्रेसमड व बायो फर्टीलायझर उत्पादन, डिस्टिलरी, कचरा



व्यवस्थापन, बायोगॅस प्रकल्प यातील काही जोड व्यवसायांचे यशस्वीपणे संचालन करुन शाश्वत विकासाचे मॉडेल निर्माण केले आहे. या सर्व उपक्रमांव्दारे शेतक–यांच्या उत्पन्नात वाढ, स्थानिक अर्थव्यवस्थेची मजबुती आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मातीस मोठा हातभार लागलेला आहे. सहकार मुल्यांवर आधारीत या प्रगत, पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करुन वरील संस्थांनी कारखान्याची ग्रीन वर्ल्ड को. प्राईड–२०२५ या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.सदरील पुरस्काराचे वितरण दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी सहकार सभागृह कॉसमॉस को.ऑप. बँक लि, शिवाजीनगर पुणे येथे सन्माननीय केंद्रीय मंत्री व राज्यातील विविध खात्याचे मंत्री यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे.सदरचा प्रतिष्ठेचा पुरस्कार कारखान्यास मिळालेबद्यल सर्व सभासद, संचालक, अधिकारी, कर्मचारी, हितचिंतक यांचे वतीने कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके, मा.श्री. धैर्यशीलकाका सोळंके, चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके, व्हा. चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके, कार्यकारी संचालक श्री. आर. सी. बडगुजर यांचे अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

## दिपक देशमुखांच्या वतीने आद्य क्रांतिकारक लहुजी साळवे यांना अभिवादन




दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

आद्य क्रांतीकारक वस्ताद लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख यांनी अभिवादन करुन जयंती साजरी केली.शहरातील साठेनगर येथे आज सकाळी सशस्त्र क्रांतिकारकाची देशातील पहिली तालीम सुरू करून तरुणांना क्रांतीचे धडे शिकवणारे देशातील पहिले क्रांतिकारक आद्य क्रांतिवीर लहुजी राघोजी साळवे यांच्या २३१ व्या जयंती निमित्त साठे नगर परळी यांच्या वतीने अभिवादन सभेचं आयोजन केल होते.यावेळी माजी नगराध्यक्ष दिपक नाना देशमुख यांनी कार्यक्रमाला उपस्थीत राहून लहुजी साळवे यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.व जयंतीनिमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्यासह नितीन चव्हाण, व साठे नगर येथील असंख्य आद्य क्रांतीकारक लहुजी साळवे यांना मानणारे तरुण व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## नियमानुसार गाळपपूर्वी दर जाहीर करा–कृती समिती

### एक रकमी एफआरपी भाव देण्याची मागणी



दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

ऊस गाळप हंगाम सुरू झाला असून अनेक साखर कारखाने ऊस गाळपाकरिता घेऊन जात आहेत मात्र जिल्ह्यातील एक ही साखर कारखान्याने ऊस दर जाहीर करणे बंधनकारक असताना देखील दर जाहीर न केल्याने ऊस उत्पादक शेतकरी कृती समितीच्या शिष्टमंडळाने ओंकार शुगर, २०–२० शुगर या साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालक यांची भेट घेत ऊस दर जाहीर करण्याची लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.यंदाच्या खरीप हंगामात झालेली अतिवृष्टी, खतांच्या किमतीत होणारी वाढ, वाढते मजुरीचे दर, ऊस पिकावर होणारा विविध रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी होणारा खर्च, यामुळे ऊस उत्पादनासाठी खर्चात वाढ झाली असून ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे.

या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी उसाला एफ.आर.पी. दर ४००० रु. देण्यात यावा, नियमानुसार ऊस गाळप सुरू करण्यापूर्वीच कारखान्यांनी ऊस दर जाहीर करावा जेणेकरून ऊस कोणत्या कारखान्यास द्यायचा हे ठरवण्यास शेतकऱ्यांना सोपे होईल.एक रकमी एफआरपीदर शेतकऱ्यांना ऊस गेल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत वितरित करावेत. ऊस कारखान्यांकडून होणारी उसाच्या वजनाची व रिकव्हरीची चोरी रोखावी, शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून कोणतेही प्रकारची कपात करण्यात येऊ नये. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस उपलब्ध असताना अवाजवी पणे लांबून वाहतूक करून ऊस गळपास आणू नये व विनाकारण वाहतूक खर्च वाढवू नये या मागण्याकरिता ऊस उत्पादक शेतकरी कृती समितीचे कॉ.एड.अजय बुरांडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, दत्ता गव्हाणे, बळीराम मुंडे, ईश्वर सोनवणे, कॉ.भगवान बडे, सुमंत उंबरे आदी शिष्टमंडळाने साखर कारखानदाराकडे केली आहे.

## बालकांच्या स्वप्नांना पंख द्या ते देशाचे भविष्य–इंजि.मुजमुले

### जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश स्कूलमध्ये बाल दिन साजरा

दैनिक वादळ वार्ता


**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील धनेगाव कॅम्प येथील जिजाऊ ज्ञान मंदिर. प्री.प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन उत्साहात, आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. त्यानिमित्त विद्यार्थ्यांनी केक कापून बालदिन साजरा केला. कार्यक्रमासाठी सांगली जिल्ह्यात सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत असलेले इंजि.अभिजीत मुजमुले हे प्रमुख पाहुणे म्हणून होते. त्यांनी बालक हे आपल्या राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांची स्वप्ने जपणे, त्यांना संस्कारी वातावरण देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे तर शिक्षकांनी, पालकांनी बालकांच्या स्वप्नांना पंख द्या ते राष्ट्राचे भविष्य असल्याचे बोलताना सांगितले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले, शिक्षिका निवेदिता मुजमुले,प्रतीक्षा गुजर उपस्थित होते.कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना स्वादिष्ट खाद्यपदार्थ, चॉकलेट व भेटवस्तू वाटप करण्यात आले. दिवसभर शाळेत आनंदी, उत्साही आणि रंगतदार वातावरण पाहायला मिळाले.



## संपादकीय

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे



, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# मातीची चूल



ग्रामीण भागातील जीवन जगण्याची तऱ्हाच निराळी! अगदी साधेपणा मात्र जीवनामध्ये सर्वात जास्त आनंदी असतील तर खेड्यातील लोकंच.कारण तेथील निसर्गरम्य वातावरण,शुद्ध हवा शुद्ध आहार व त्याचबरोबर शुद्ध विचार सुद्धा.अजूनही टिकून आहेच कारण,आहारातून आचार-विचार रुजतात.त्या आहाराला मायेची उब असते.गेल्या दोन ते दशका अगोदर गावात प्रत्येक घरी मातीच्या चुली होत्या.आया-बहिणीच्या हातच्या जेवणाला गोड चव होती.कारण ते मातीच्या चुलीवर बनवल्या जायचं. काही अंशी अजूनही मातीच्या चुली आहेत.मात्र हल्ली खेड्यापाड्यातही विद्युत शेगड्या अन गॅस जाऊन पोहचले.

मातीची चूल बनवणे ही सुद्धा एक सुंदर कलाच आहे,कारण चुलीची रचना लक्षात घेता ती मातीच्या गोळ्यातून कोरून साकारलेली असतें.त्यावर घरातील सर्व प्रकारची स्वयंपाकाची भांडी बसायला हवी. असा योग्य समतोल साधलेला असतो.मातीपासून चूल बनवण्यासाठी आई व आईच्या मैत्रिणी सुंदर सुंदर कल्पना वापरायच्या.आई गावाच्या बाजूला असलेल्या नदीच्या काठावरून कोपऱ्यातील छान काळी माती टोपल्या-टोपल्याने घेऊन यायची. घराच्या अंगणासमोर टाकून ठेवायची.त्यात काही मातीचे ढेकळं असल्यास दगडाच्या तुकड्याने कुटून-कुटून बारीक करायची. त्यावर हलकंसं पाणी मारून ठेवायची.त्या मातीचा खूप छान सुगंध यायचा.त्या भिजलेल्या मातीला कुंभारासारखं छान तुडवायची.त्यामुळे माती एकजीव व्हायची.छान चिकट-चिकट झाल्यावर पोळ्या बनवायच्या पिठाप्रमाणे छान मळून घ्यायची.शक्य झाल्यास मातीचे गोळे बनवून घरात ज्या ठिकाणी चूल बनवायची त्याठिकाणी टोपल्याने घेऊन यायची.तेथे आयताकृती ओटा बनवायची.साधारण दीड बाय अडीच किंवा तीन फुटाचा लांबी रुंदी असलेला या मातीच्या ओट्याची उंची सुरुवातीला एक फुटाची असायची.या आयताकृती मातीच्या ओट्याला पूर्ण एकजीव करून घ्यायची.आईकडे मोजायला इंच पट्टी, फुटपट्टी कसली? तिचे माप म्हणजे सराटा,चमचा किंवा पातेले,भगूने असायचे.या मातीचा आयताकृती ओटा पाणी मारून-मारून छान मुरवायची.साधारण दोन ते चार दिवस त्यातील ओलसरपणा कमी व्हायचा.मात्र काही अंशी अजून ओलसर करून ठेवायची पूर्णतः चिखल नाही परंतु हल्लीच्या केकप्रमाणे त्यातील मातीचा मेळ घालून ठेवायची,जेणेकरून त्यात एखादी धारदार वस्तू घूसवल्यास ती घुसेल.त्या मातीच्या लगद्याला कोरता येईल.या पद्धतीने तो भिजलेल्या मातीचा लगदा चुलीसाठी तयार असायचा.

मातीची चूल बनवण्याची कला सर्वच महिलांना अवगत नसायची.म्हणून एकमेकींच्या सहकार्याने महिला चुली बनवत असत.आई मात्र मातीची चूल बनवण्यात निपून होती.आईच्या मैत्रिणी आईला चूल बनवायला बोलवत असत.आई मैत्रिणींना छान आकर्षक चूल बनवून द्यायची.अजूनही गावाकडे हा एक गुण विशेष आहे.एकमेकांच्या मदतीला धावून जातांना कसलाच कमीपणा नसतो किंवा अहंकार नसतो.अगदी मनापासून एकमेकांच्या मदतीला धावून जातात.तर अश्या पद्धतीने चुलीसाठी भिजवून ठेवलेल्या मातीचा आयताकृती ओटा हा पाच ते सहा दिवसानंतर चूल बनवण्यास लायक व्हायचा.चूल बनवण्यासाठी आईचे साहित्य कोणते असायचे. तर ते म्हणजे वावरात वाढलेलं तन काढण्याचं खूरपं,सराटा,चमचा,छोटी वाटी वगैरे.हे सर्व साहित्य घेऊन चूल बनवायला बसायची.हे साहित्य वापरूनच आई त्या मातीच्या लगद्याची चूल बनवताना तंतोतंत माप घ्यायची.त्या आयाताकृती ओट्याची ओबडधोबड व अनावश्यक माती खूरुप्याच्या साह्याने खरडून घ्यायची व चारी बाजू एखाद्या भिंतीप्रमाणे गुळगुळीत करायची.त्याचे दोन भाग केल्यास,एक मुख्य चूल व अर्धा भाग उल्ह्यासाठी ठेवायची.त्या मातीच्या ओट्यातून चुलीचा व उल्ह्याचा आकार रेखाटण्यासाठी,आई तुरखाडीची जाड काडी वापरायची.आई तुरखाडीच्या काडीने अगोदर ज्या ठिकाणी चुल बनवायची त्या ओलसर मातीवर आखून घ्यायची.खुरपं किंवा अनुकूचिदार वस्तूने चुलीच्या आखलेल्या भागातील माती काढून टाकायची.त्याला चुलीचा आकार येईपर्यंत इतर बारीक वस्तूने आतील अनावश्यक माती काढून सुबक आकार येईल अशी रचना करायची.आतील भागातील माती काढल्यावर पूर्ण हात जाईल अशी आत पोकळी तयार व्हायची.आतील भाग अजून आकर्षक करण्यासाठी सराटा,चमचे,वाटी हे वापरायची.अर्ध्या भागात चुलीचा आकार पूर्ण झाल्यावर उजवीकडील भागात उल्हं करण्यासाठी जो चुलीचा भाग करून जी माती काढलेली असायची.त्याच आतील भागातून बोगदा कोरल्यासारखं अर्ध्या ते पाऊन फुट इतके कोरल्यावर पृष्ठभागावरील बाजूला गोलाकार माप घेऊन, तेवढा भाग खुरप्याने किंवा सराट्याने करून घ्यायची.म्हणजे वरील बाजूने गोलाकार व मोठ्या चुलीतून तिरकस भुयारासारखे कोरून उल्हं बनायचं.ते आतल्या आत कोरलेलं असायचं. मात्र चुलीच्या वरील बाजूने दिसायचं.वरील बाजूस मातीचे तीन गोळे ठेवून गॅसच्या शेगडी प्रमाणे बनवलेले असायचे.जेणेकरून त्यावर छोट्या आकाराचार भगून किंवा पातेलं बसू शकेल.या उल्ह्याला आतून अग्नी, विस्तव कसा पोहोचेल? तर चुलल पेटवलेल्या काड्याचा जो अग्नी,विस्तव असतो तो त्या भुयासारासारखा कोरलेल्या छिद्रातून सरळ पोहचायचा.या चुल्ह्याचा वापर विशेषत: भाजीला फोडणी मारली असता,भाजी मंद आचेवर शिजवण्यासाठी,पातेल्यात तांदूळ शिजायला घातल्यास छान मंद आचेवर भात शिजवण्या साठी त्याचप्रमाणे मुख्य चुलीवर आई भाकरी बनवत असल्यास बनवलेली भाजी पुन्हा गरम करायला.तव्यावरचा ठेचा गरम करायला.दूध भाकर खायची असल्यास दूध गरम करायला.या उह्याचा वापर व्हायचा.आईने गरमागरम भाकर बनवली की,ऊल्ह्यावर दूध,ठेचा,चटणी गरम शिजायचे.आईने बनवलेली गरम-गरम भाकर अन ठेचा,चटणी, दूध,भाजीवर ताव मारायचो.

चुलीचा दर्शनी भाग किल्ल्याच्या महाद्वारासारखा दिसायचा. आतील बाजू गोल घुमटाकार दिसायची.वरील भागावर पातेलं, भगूने,तवा बसावा म्हणून तशी रचना केलेली असायची.एखादं पातेलं छोटं असल्यास,मध्ये एक लोखंडाची पट्टी ठेवल्या जायची.जेणेकरून ते पातेलं लवंडणार नाही.चुल शक्यतो घरातीलएल आकारातील भागात असायची. किंवा नसल्यासही एक भाग तिचा भिंतीला असायचाच.आई त्याभिंतीला किंवा चुलीच्या वर भिंतीला एक गोखलं बनवायची. गावाकडे त्याला देवळी पण म्हणतात.त्यामध्ये माचीस ठेवल्या जायची.जेणेकरून चूल पेटवतांना लवकर सापडायला हवी. त्याचप्रमाणे अजून जागा शिल्लक असल्यास सांडस,पळी चमचा, सराटा, विळा,फुंकणी ठेवायला कोपरा बनवायची.अर्थात स्वयंपाक बनवण्यास आवश्यक वस्तू या सर्व एका ठिकाणी ठेवण्यासाठी तशी व्यवस्था केलेली असायची. जेणेकरून त्या सर्व वस्तू व्यवस्थित ठेवल्या जायच्या.वेळेवर सापडायच्या.खरच!किती बुद्धी कौशल्याचा वापर करून गावाकडील आया मातीच्या चुली छान सुंदर बनवायच्या ना! जरी अडाणी, अशिक्षित असल्या तरी एखाद्या शिकलेल्या इंजिनीयरला लाजवेल अशी सुंदर कलाकृती,डिझाईन व सर्व आकर्षक असे साचेबद्ध बनवल्या जायचे.बाजारात साच्याने बनवलेल्या चुल्ही विकायला आल्या.मात्र त्या तकलादू स्वरूपाच्या असायच्या.तसंच जी कलाकृती व सुबक रचना असायला हवी.ती आढळून येत नव्हती.

माती पासून बनवलेल्या चुलीमध्ये आईची मेहनत, कला व माया होती,म्हणून चुलीवरच्या जेवणाला मधुर चव होती.हल्ली, बघा ना! किती विरोधाभास दिसून येतोय.मानवाने गॅस चा शोध लावला.भयंकर वेगवेगळ्या प्रकारची प्रगती केली.एक क्षणात लाइटरने बटन दाबले की गॅस पेटतो.मात्र गॅसवर बनवलेल्या पदार्थाला फारशी चव नसते.याची प्रत्येकाला जाणीव झाली.हे सत्य कळायला लागले.परंतु मायेची उब असलेल्या चुलीवरच्या जेवणासाठी माणूस आसूसलेला असतो. म्हणून शहराच्या रस्त्यावर हल्ली खूप मोठ-मोठे हॉटेल,ढाबे,खानावळीवर कपाळ भर कुंकू लावलेलं,नाकात नथ,चोळी,लुगडं नेसलेली आणि अन डोक्यावर पदर घेतलेल्या आजीचे मातीच्या चुलीवर स्वयंपाक करतांना बॅनर्स लावलेले दिसून येत आहेमला.आकर्षणासाठी हॉटेल मालक येथे अस्सल मराठमोळ चुलीवरचं जेवन मिळेल, चुलीवरचे मटण मिळेल म्हणून जाहिरात व पोस्टर लावत आहे.हेच मायेचं, चवदार, स्वादिष्ट चुलीवरचे जेवण जेवण्यासाठी आज खानावळीवर, हॉटेलवर,ढाब्यांवर गर्दी होताना दिसून येत आहे. जरी फॅशन म्हणून गेला तरी मात्र मायेचं मधुर चवीचे महत्त्व कळलं म्हणूनच ना!कारण शेवटी तुम्ही कितीही प्रगती करा. कितीही वेगळ्या पद्धतीचे चायनीज,परदेशी जेवण करा त्यात तुम्हाला समाधान मिळणार नाही.मात्र मायेची उब गोड,सुमधुर चवी मातीच्या चुलीवरच्या जेवणातच असते. याची पुन्हा ओळख पटली. हाच तर खरा मायेच्या प्रेमाचा ओलावा असतो.अन गावाकडच्या मातीच्या चुलीची शक्ती असते.

**-श्री विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता जि बुलडाणा**

# दिल्लीतला भयानक स्फोट
# वेदना, शंका आणि जबाबदारी

राजधानी दिल्लीच्या निःशब्द सकाळी अचानक झालेल्या एका कार स्फोटाने संपूर्ण देशाला हादरवून टाकले. धुराने भरलेल्या रस्त्यावर, किंचाळ्यांनी थरथरलेल्या आकाशाखाली, क्षणात घडलेली ती घटना फक्त शहराला नव्हे तर भारतीय जनमानसालाही हलवून गेली. ही घटना केवळ एका वाहनाच्या स्फोटाची नाही तर ती देशाच्या सुरक्षेवरील, राजनैतिक शिस्तीवरील आणि आपल्या सामूहिक असुरक्षिततेवरील कठोर प्रश्नचिन्ह आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक रस्त्यावर, रेड फोर्टच्या जवळ एका कारमधून अचानक झालेल्या स्फोटाने अनेक जीवनं संपवली आणि हजारो लोकांच्या मनात भीतीची आणि असमंजसतेची झळ उभी केली आहे. हे केवळ एका क्षणातील भीषण घटना नाही तर ह्या देशाच्या सुरक्षिततेवरील आणि नागरिकांच्या दैनिक जिवनावरच्या हमखास परिणामांचाही प्रश्न आहे. सरकारने ही घटना आताही दहशतवादी घटना म्हणून मान्य केली असून तपासाच्या व्यापक यंत्रणेला आदेश देण्यात आले आहेत. या घटनेत मृतांची संख्या आणि जखमींचे वेदनादायी दृश्ये आपल्याला आठवण करून देतात की आतंकवाद म्हणजे फक्त संरचना भडकेस दाखवणारी क्रिया नव्हे, तर ते आपल्या समाजातील सर्वात सामान्य माणसांचे भविष्य, कुटुंब आणि स्वप्नांचे विघटन आहे. पहिल्या तासांतच लोकांनी आपापल्या नातेवाईकांची माहिती शोधली, हॉस्पिटल्सवर भावनिक रांगा केल्या आणि वार्तांनी शहरात घाबरलेले वातावरण पसरले. म्हणजेच, मानवी त्रास हा घटनापेक्षा कितीतरी पटीने मोठा असतो.



पोलिसांनी घटनास्थळावरून अनेक नमुने गोळा केले आहेत. वाहनाचे अवशेष, धातूचे तुकडे आणि फॉरेन्सिक तपासणीसाठी सुमारे चाळीसहून अधिक नमुने केंद्राकडे पाठवले गेले असून, प्राथमिक तपासात स्फोट अत्याधुनिक विस्फोटकाने झाल्याची शक्यता व्यक्त झाली आहे. एनआयए आणि दिल्ली पोलिसांचे पथक रात्रीपर्यंत शोधमोहीम राबवत आहे. तसेच, संशयित वाहन आणि त्याच्या मालकाच्या मागोमाग शेजारील राज्यांमध्ये आणि गावांमध्ये छापा मारण्यात आले आहेत; काही लोकांना ताब्यातही घेतल्याचे वृत्त आहे. ह्या प्राथमिक तपासांनी सूचित केले आहे की, या स्फोटाचा संदर्भ केवळ स्थानिक गुन्हेगारी नव्हे तर संघटनाबद्ध दहशतवादाशी संबंधित असण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे देशाच्या सुरक्षा यंत्रणांनी विशेष कायदे आणि राष्ट्रीय तपास संस्था या प्रकरणात सक्रिय केल्या. आता तपासाच्या दिशा दोन आहेत. पहिली, स्थानिक गुन्हेगारी टोळीचा हात आणि दुसरी, परदेशी दहशतवादी संघटनांशी संभाव्य संबंध.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

मीडिया अहवालांनुसार प्राथमिक चौकशीत काही संशयित व्यक्ती आणि कनेक्शन पाकिस्तान-आधारित गटांशी जोडले जात आहेत. विशेषतः जैश-इ-मोहम्मद सारख्या संघटनांचा संदर्भ येत आहे, परंतु हे निष्कर्ष अद्याप अंतिम सिद्ध झालेले नाहीत. ही बाब अजून तपासाधीन आह आणि घाईघाईने निष्कर्ष काढणे म्हणजे न्यायाच्या प्रक्रियेला धक्का देणे होईल. तपासकांद्वारे पकडलेलेल्या व्यक्तींचे संबंध, संदेशवाहक, आणि आंतरराज्यीय हालचाली तपासल्या जात आहेत; परदेशी हाताचे आरोप करणे ही गंभीर बाब आहे आणि त्यासाठी ठोस दर्शने आवश्यक आहेत. माध्यमांच्या आळयानुसार आत्तापर्यंत काही ज्या तपास-उपक्रमांबाबत माहिती समोर आली आहे, त्यात पाकिस्तान-आधारित संघटनांचा संदर्भ आला आहे. परंतु हा तपास अजून प्रवाही व विस्तृत स्वरूपात आहे. भारताने नेहमीच आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे. पण आता या घटनेने पुन्हा एकदा दाखवले की, शब्दांपेक्षा कृतीचा काळ आला आहे. राजनैतिक दबाव, सीमा सुरक्षा, गुप्तचर यंत्रणांची अद्यावत क्षमता आणि सायबर-आधारित मॉनिटरिंग प्रणाली, हीच या नव्या काळाची शस्त्रं आहेत.

दिल्लीने आतापूर्वीही अशा प्रकारच्या भयकृत घटनांना सामोरे गेले आहे. ही पहिली वेळ नाही तर यापूर्वी २००५, २००८, २०११ आणि २०२१ मध्येही राजधानीत अशाच प्रकारचे स्फोट झाले. त्या आत्मघाती आणि स्फोटांची स्मृती ताजी आहे. अशा पार्श्वभूमीवर, जर तपासात पाकिस्तान-स्थित संघटनांचा ठोस पुरावा मिळाला, तर त्याचे राजनैतिक व सामरिक परिणामही दूरगामी असतील. परदेश धोरण, सीमा सुरक्षा आणि परस्पर विश्वास या सर्वांवर प्रभाव पडू शकतो. परंतु हे राजकीय परिणाम योग्य तपास व पुराव्यांवर अवलंबून असावेत; ज्या क्षणी तपास पूर्णपणे सिद्ध करणार त्या पुराव्यांचा आधार न घेताच घोषणा केल्या गेल्या तर चुकीचे निर्णय घेण्याची शक्यता वाढते. प्रत्येक वेळी सरकारने सुरक्षा वाढवण्याची, तपास जलदगतीने करण्याची घोषणा केली. परंतु काही महिन्यांनी तीच शिथिलता, तीच निष्क्रियता दिसून आली. आज पुन्हा तोच प्रश्न समोर आहे, आपली सुरक्षा फक्त फाईल्सपुरती आहे का?

त्याकरिता आपल्या सरकारकडून आणि समाजाकडून काही अपेक्षा आहेत. जसे कडक पण पारदर्शक तपास, सर्व पुरावे ताब्यात घेऊन, फॉरेन्सिक आणि सायबर तपास त्वरित आणि वैज्ञानिक पद्धतीने करणे आवश्यक आहे. एखाद्या देशावर आरोप करण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्तरावरही पुरावे सादर करण्याजोगे असावेत. दुसरे असे की, स्थानीय सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे, सार्वजनिक स्थळांवर तातडीने सुरक्षा बळ वाढवले पाहिजे; वाहन तपास, सीसीटीव्हीचे विश्लेषण आणि बायोमेट्रिक/फॉरेन्सिक क्षमता वाढवणे गरजेचे आहे. तिसरे, समावेशक सामाजिक प्रतिसाद, भय पसरवणाऱ्या प्रतिक्रीयांपासून बचाव करायला हवेत; चुकीच्या अफवांमुळे समाजात गुप्तमत निर्माण होऊ नये. पीडित कौटुंबिकांना तातडीची आर्थिक व मानसिक मदत देणे अत्यावश्यक आहे. तसेच, डिप्लोमॅटिक पिढी, जर परदेशी हात सिद्ध झाला तर तेथील कूटनीतिक चॅनेल्स आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयीन प्रणालीचा वापर करून मुद्दा मांडला जावा. युद्धगाठ किंवा आक्रोशापेक्षा कायदेशीर व राजनैतिक मार्ग अधिक स्थायी असतात.

स्फोटाने उडवलेली शोकरात्र आणि जखमी लोकांची औषधासाठीची नजर. हे सगळे दर्शन आपल्याला विसरू नयेत. दुःखाचे क्षण सामाजिक सहकार्याने कमी होतात: रक्तदान, आर्थिक मदत आणि भावनिक आधार यांमुळेच पीडित कुटुंबांना उभारी येते. जर तपासात खऱ्या अर्थाने परदेशी गुन्हेगारांचे हात सापडलेही तरही आपली सुरक्षात्मक प्रतिक्रिया आणि न्याय मागणी मानवीय आणि कायदेशीर मार्गांनी केली पाहिजे. या स्फोटात गमावलेले जीव, जखमी झालेल्या निरपराध नागरिकांची वेदना आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर दिसणारे अविश्वासाचे सावट. हे सगळं एकत्र पाहिलं की प्रश्न पडतो, कधी थांबेल हा हिंसेचा खेळ? दहशतवादाला धर्म, देश किंवा विचारसरणी नसते. तो फक्त भीती निर्माण करतो, आणि ती भीती आपल्याला एकमेकांपासून दूर नेते. आज गरज आहे ती एकतेची, समजुतीची आणि सहानुभूतीची. स्फोटानंतर सर्वसामान्य नागरिकात निर्माण झालेली भीती स्वाभाविक आहे, परंतु अफवांवर विश्वास ठेवू नये, कारण दहशतवाद केवळ बॉम्बने नाही तर अफवांनीही मन उडवतो. आपण सजग राहून, संशयास्पद हालचालींची माहिती दिली, तर देशाचं सुरक्षा कवच अधिक मजबूत होईल.

दिल्लीतील कार स्फोटात झालेली हानी आणि सामाजिक धक्का अतिशय मोठा आहे. दिल्लीतील हा कार स्फोट फक्त राजधानीचा नाही, तर संपूर्ण भारताचा धक्का आहे. प्राथमिक तपासानुसार काही मीडिया अहवाल पाकिस्तान-आधारित संघटनांशी जोडलेले संदर्भ देतात, परंतु हे अंतिम निष्कर्ष नाहीत. तपास सुरू आहे आणि देशाने संयम राखून, पुराव्यांच्या आधारावर न्याय्य निर्णय घ्यावा. पीडितांना त्वरित मदत देणे, सुरक्षा मजबूत करणे आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर मार्ग वापरून दोषींवर कारवाई करणे, हे आपल्या देशाची जबाबदारी आहे. ही घटना आपल्याला सांगते की, सुरक्षा ही फक्त सरकारची जबाबदारी नाही, तर ती प्रत्येक नागरिकाची शपथ आहे. शेवटी, भयाच्या अंधारात मानवी सहानुभूतीच आपल्याला प्रकाशाकडे घेऊन जाईल. आपण भितीने नव्हे तर विश्वासाने पुढे गेलं पाहिजे, कारण प्रत्येक स्फोटानंतर राखेतून उभा राहणारा भारत हा जिद्दी, संयमी आणि न झुकणारा भारत आहे. या कार स्फोटावर पर्याय म्हणून सावध देश, सजग जनता आणि सशक्त सुरक्षा हवीच

# नाशिकचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक तेजस्वी होईल; मुख्यमंत्री फडणवीसांनी व्यक्त केला विश्वास

दैनिक वादळ वार्ता

**नाशिक (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधिवत पूजा करून सिंहस्थ कामाचे भूमिपूजन केले. यावेळी आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात पहिल्या टप्प्यातील ४४ कामांच्या एकूण ५,६५७.८९ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. या विकासकामांमुळे नाशिकचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक तेजस्वी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. केंद्र सरकारच्या भांडवल गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजनेअंतर्गत ९९.१४ कोटी खर्चाच्या रामकाल पथ प्रकल्पाची पायाभरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिक येथे करण्यात आली. रामकुंड परिसरात झालेल्या या समारंभाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आणि क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, आमदार ॲड. राहुल ढिकले, आमदार दिलीप बनकर, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, तसेच विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंग, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, महापालिका आयुक्त मनीषा



खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अतिरिक्त आयुक्त कल्पना नायर आणि सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रकल्पाच्या संकल्पना आराखड्याचा आणि मॉडेलचा आढावा घेतला. रामकाल पथ उपक्रम रामकुंड मार्गावरील वारसा वास्तूंचे पुनरुज्जीवन आणि जतन करणे, दर्शनी भाग पुनर्संचयित करणे आणि पर्यटक आणि यात्रेकरूंसाठी पायाभूत सुविधा वाढवणे यावर लक्ष केंद्रित करेल. या प्रकल्पाचे उद्दिष्ट रामकुंड, सीता गुफा, काळाराम मंदिर, राम-लक्ष्मण गुफा आणि इतर प्राचीन मंदिरे यासारख्या स्थळांचे आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करणे आहे.आगामी २०२७ च्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या तयारीसाठी, सरकारने नाशिकचा सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जगासमोर आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात विकास कामे हाती घेतली आहेत. केंद्र सरकारच्या पाठिंब्याने उभारलेला रामकाल पथ प्रकल्प या दिशेने एक मोठे पाऊल आहे. गोदावरी नदीच्या पवित्र तीरावर भेट देणाऱ्या भाविकांना ते अधिक समृद्ध आणि संस्मरणीय अनुभव देईल.

## शेतकऱ्यांसाठी २० हजार कोटींचा जीआर जारी-कृषीमंत्री दत्ता भरणे यांची माहिती

**पुणे (वृत्तसंस्था)**-राज्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी राज्य सरकारने २० हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. या मदतीसाठीचा शासन निर्णय (जीआर) काढण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात मोठ्या प्रमाणात पैसे जमा होत आहेत, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी बुधवारी दिली.कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी सांगितले की, केंद्र सरकार राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) च्या निकषांनुसार मदत करत असते. राज्य शासनाने नुकसानीची पाहणी करून याबाबतचा अहवाल केंद्राला सादर केला आहे. त्यामुळे लवकरच केंद्राकडूनही अतिरिक्त मदत जाहीर होण्याची अपेक्षा आहे. या प्रकरणी सरकारने जाहीर केलेली संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना दिली जाईल.



कृषीमंत्री भरणे यांनी यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांवरही भाष्य केले. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांनी मंगळवारी पुण्यातील शिवाजीनगर येथील पक्ष कार्यालयात पुणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. याविषयी ते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जागा कशा वाढतील, याबाबत सूचना घेण्यात आल्या. त्यावर अजित पवार यावर अंतिम निर्णय घेतील. राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागा वाढवण्यासाठी आवश्यक ते निर्णय पक्ष पातळीवर घेतले जातील. सध्या प्रत्येक तालुक्यानुसार पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या भेटी सुरू आहेत.कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊन आणि विविध ठिकाणच्या भावना समजून घेऊन उमेदवारी देण्याचा निर्णय घेण्यात येईल. कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला जाईल आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिक जागा निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. काही ठिकाणी महायुती म्हणून भाजप आणि शिवसेनेसोबत स्थानिक पातळीवर युती केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

### अजित पवार 'वर्षा'वर संतापले हा निव्वळ खोटारडेपणा

## पार्थ पवार प्रकरणात खालच्या अधिकाऱ्यांनी खरी बदमाशी केली-मंत्री बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरे गटाच्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना सरकारबाहेर पडण्याचा इशारा दिल्याच्या दाव्यात कोणतेही तथ्य नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. हा निव्वळ खोटारडेपणा आहे. मी स्वतः त्यावेळी वर्षा बंगल्यावर होतो. अजित पवार व त्यांचे सहकारी एका वेगळ्याच कामासाठी तिथे आले होते. त्यावेळी त्यांच्यात दानवे म्हणतात तशी कोणतीही चर्चा झाली नाही, असे ते म्हणालेत.अंबादास दानवे यांनी पार्थ पवारांचा घोटाळा भाजपनेच बाहेर काढल्याचाही आरोप केला आहे. बावनकुळे यांनी त्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, ना



अंबादास दानवे यांना, ना चंद्रशेखर बावनकुळे यांना किंवा किंवा मुख्यमंत्र्यांना हे माहिती होते. खालच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात खरी बदमाशी केली. एक तहसीलदार, मुद्रांक अधिकारी व देणारे - घेणारे दोन लोक, या लोकांनी केलेली ही चूक आहे. खालचे अधिकारी काय करतात हे सरकारला थोडेच माहिती असते. जेव्हा बातमी येते तेव्हा सरकार त्याची दखल घेते.त्यामुळे रोजच्या व्यवहारात खालचा एखादा तलाठी, एखादा तहसीलदार किंवा एखादा मुद्रांक अधिकारी काय करेल हे सांगता येत नाही. त्यांना आदेश देण्याचा अधिकार आहेत. ते त्यांच्या अधिकारांचा कसा गैरवापर करतात हे सरकारला थोडेच माहिती असते. सरकारला जेव्हा माहिती होते तेव्हा कारवाई होते.

## खडसंगी येथे माजी आ.बच्चू कडू यांचा भव्य सत्कार सोहळा

दैनिक वादळ वार्ता

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील खडसंगी येथे दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी शेतकरी नेते, माजी मंत्री, शेतकरी-शेतमजूर-मेंढपाळ आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे लढवय्ये नेते माजी आमदार बच्चूभाऊ कडू यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या सत्कारानिमित्त आयोजित सभेत शेतकरी प्रश्न, सरकारच्या धोरणांविरोधात लढा आणि आगामी निवडणुकीतील शेतकरी एकजुटीचा निर्धार यावर चर्चा झाली.

सभेच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे माजी आमदार वामनराव चटप होते. यावेळी शेतकरी संघटनेचे पूर्व विभाग संपर्कप्रमुख डॉ. हेमंत इसनकर, शेतकरी कार्यकर्ते व माजी पंचायत समिती सदस्य विजय पाटील गावंडे, वाहनगावचे सरपंच प्रशांत कोल्हे, शंकरपूरचे उपसरपंच अशोक चौधरी, वरोऱ्याचे प्रहार शेतकरी संघटनेचे प्रमुख किशोर डुकरे, आंबोलीचे उपसरपंच वैभव ठाकरे, तसेच शुभम मंडपे आदी मान्यवर उपस्थित होते.

**आपल्या भाषणात बच्चूभाऊ कडू म्हणाले की,शेतकरी एकजुटीचा विजय असो!**

ज्या सत्ताधाऱ्यांनी आणि पक्षांनी शेतकरीविरोधी धोरण राबवले, त्यांना येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत मतदान करू नका. शेतकरी आंदोलनातून ३० जूनपर्यंत कर्जमाफी मिळवून घेऊ, आणि १ जुलैपासून शेतीमालाच्या हमीभावासाठी देशव्यापी रेलरोको आंदोलन उभारू. शेतकऱ्यांचे मरण हे सरकारचे धोरण बनले आहे; त्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि शेतमजुरांच्या मुलांनीच या प्रश्नावर राजकारण करून सत्ता प्राप्त करावी.

माजी आमदार वामनराव चटप यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनीही एक जुलैपासून सुरू होणाऱ्या आंदोलनाची रूपरेषा स्पष्ट केली.डॉ. हेमंत इसनकर यांनी युवा शेतकऱ्यांच्या अडचणी अधोरेखित करत सरकारने शेतकऱ्यांसाठी पेन्शन योजना सुरू करावी, तसेच ग्रामीण युवक-युवतींना पाच हजार रुपये मासिक सहाय्य द्यावे, अशी मागणी केली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाहनगावचे सरपंच प्रशांत कोल्हे यांनी केले. त्यांनी संपूर्ण तालुक्यात शेतकरी चळवळ कशी उभारता येईल, तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आमदार बंटी भांगडिया निष्क्रिय असल्याचे सांगून भिकूंच्या शेतकऱ्यांचे उदाहरण दिले.खडसंगी, सावरी, आंबडी, बेगडे, रेंगाबोडी परिसरातील असंख्य शेतकरी, शेतमजूर आणि युवा शेतकऱ्यांनी या सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## कर्जतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे यांच्या प्रमुख उपस्थिती भव्य पक्षप्रवेश सोहळा




दैनिक वादळ वार्ता

**कर्जत । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कर्जत-खालापूर आढावा बैठक आणि भव्य पक्षप्रवेश सोहळा आज (दि.१३) रॉयल गार्डन, कर्जत येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनीलजी तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती पुंडलिक पाटील, शिवेवेना शिंदे गटाचे कर्जत खालापूर विधानसभा संघटक पंकज पाटील, माजी नगरसेविका पुष्पा हरिश्चंद्र दगडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेने रायगड जिल्हा सचिव जे. पी. पाटील, युवा नेते दिनेश जाधव, माजी नगरसेवक खोपोली चंद्रप्पा अनिवार, सामाजिक कार्यकर्ते योगेश मारुती गायकवाड, कर्जत तालुका धनगर समाज अध्यक्ष तुकाराम बाबू आखाडे , धनगर समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते बाबू धोंडू ढेबे व रामचंद्र नारायण ढेबे, अभिजीत विजय राणे, श्री. राजेंद्र साखरे, माजी नगरसेवक खोपोली मधुकर दळवी ,माजी नगरसेविका खोपोली मेघा वाडकर, माजी नगरसेविका खोपोली चंद्रभागा चंद्रप्पा अनिवार, शिवसेना शिंदे गट बीड जिल्हा परिषद विभाग संघटक मनोज वसंत बोडके, माथेरान शहर महिला काँग्रेस अध्यक्ष स्नेहा संतोष चव्हाण, खरीवली पंचायत समिती शिवसेना सहसंघटक सतीश बाबाजी मोरे, युवासेना शाखाप्रमुख झाडाणी शंकर रखमाजी मोरे यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी जाहीर पक्ष प्रवेश केला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे माथेरान नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी अजय सावंत आणि कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी पुष्पाताई दगडे यांची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.याप्रसंगी जेष्ठ नेते दत्तात्रय मसुरकर, प्रदेश उपाध्यक्ष . सुनील पाटील, प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, रायगड जिल्हा प्रमुख प्रवक्ते . भरत भाई भगत, सरचिटणीस श्री. एकनाथ धुळे, कर्जत शहर अध्यक्ष भगवान शेठ भोईर, कर्जत तालुका अध्यक्ष श्री. दिपक श्रीखंडे, खालापूर तालुका अध्यक्ष श्री. संतोष बैलमारे, जिल्हा युवक अध्यक्ष . अंकित साखरे, कर्जत खालापूर विधानसभा अध्यक्षा अश्विनीताई पाटील यांसह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्धा जिल्हा 'प्रेस्बायोपिया'मुक्त करण्यासाठी राज्य शासनाचा नज फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार

### नज फाऊंडेशनच्या भागीदारीने प्रतिबंधात्मक अंधत्व निवारणाला योगदान मिळेल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता

**वर्धा । प्रतिनिधी**

वयोमानपरत्वे जवळपास प्रत्येकच व्यक्तीत झीशीलूेळिर अर्थात 'जरादुरदृष्टी' किंवा 'वृद्धापकाळातील दुरदृष्टी' हा आजार उद्भवतो. वर्धा जिल्ह्याला या आजारापासून मुक्त करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने नज फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. फाऊंडेशनच्या सहकार्याने जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तीची तपासणी व आजार आढळून आलेल्या व्यक्तींना विनामुल्य चश्मे वितरीत केले जातील. प्रेस्बायोपिया निदान व प्रतिबंधासाठी वर्धेला 'मॉडेल' जिल्हा बनविण्यात येणार असून त्याच धर्तीवर पुढे संपुर्ण राज्यात ही मोहिम राबविण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे प्रतिबंधात्मक अंधत्व निवारणाला योगदान मिळेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

नज फाऊंडेशनचे शिक्षण, पर्यावरण, उद्योजकता या क्षेत्रात उल्लेखनिय कार्य आहे. फाऊंडेशनच्या भागीदारीतून वर्धा जिल्ह्यात प्रेस्बायोपिया निदान आणि चष्मा वितरणाचे एक 'मॉडेल' तयार होईल. प्रतिबंधात्मक अंधत्व नियंत्रण हे माझ्या प्राधान्याच्या बाबींपैकी एक उद्दिष्ट आहे आणि त्यासाठी फाऊंडेशनचे सहकार्य चांगले योगदान देईल, असे सामंजस्य करारानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वर्धाचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर व आ.सुमित वानखेडे यांच्या विशेष पुढाकारातून हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.नज फाऊंडेशनसोबत भागीदारीतून संपुर्ण राज्याला 'प्रेस्बायोपिया'मुक्त करण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी या आजाराचे निदान व चश्मे वाटपाची चौकट निश्चित करण्यासाठी वर्धा जिल्ह्यात ३ ते ६ महिन्याच्या कालावधीत प्रायोगिक तत्वावर ही मोहिम राबविण्यात येणार आहे. यासाठी साधारणपणे ४ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित



आहे. या कामात वर्धेला 'मॉडेल' जिल्हा बनवून पुढे संपुर्ण राज्यात वर्धेच्या हा उपक्रम राबविला जाईल.

सन २०२४ साली वर्धा जिल्ह्याची लोकसंख्या साधारणपणे १४ लाख इतकी होती. त्यातील ग्रामीण लोकसंख्या ६७ टक्के म्हणजे ९ लाख इतकी आहे. ग्रामीण भागात साधारणपणे २ लाख प्रेस्बायोपियाचे रुग्ण असण्याचा अंदाज आहे. प्रत्येक नागरिकाची विनामुल्य प्रेस्बायोपियाची तपासणी करुन आजार आढळून आलेल्या रुग्णांना विनामुल्य चश्मे वितरीत केले जातील. प्रेस्बायोपिया रुग्णांची तपासणी व चश्मे वाटपानंतर त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन त्यांचा वार्षिक नफा १३० कोटी रुपयाने वाढण्याचा अंदाज आहे.

नज फाऊंडेशनच्या भागीदारीतून ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या सहकार्याने वर्धा जिल्ह्यातील ३५ वर्षावरील प्रत्येक व्यक्तींमध्ये प्रेस्बायोपियाबाबत जनजागृती केली जातील. यासाठी आशा, नेत्र सखींना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. नेत्रतज्ज्ञ, नेत्र सखी, आशा ग्रामस्तरावरच प्रेस्बायोपिया तपासणी करतील. हा आजार आढळून आलेल्या रुग्णांना त्यांच्या आवश्यक्तेप्रमाणे गावातच चश्मे वाटप करतील. नज फाऊंडेशन उपक्रमासाठी आर्थिक सहाय्य व आवश्यक तेवढे चश्मे तसेच आवश्यक साहित्याचा पुरवठा करतील. मोहिमेंतर्गत प्रशिक्षण तसेच उपक्रमाचे नियंत्रण व मुल्यमापन करणार आहे.

**प्रेस्बायोपिया म्हणजे काय ?**

प्रेस्बायोपिया म्हणजे वयोमानपरत्वे उद्भवणारा डोळ्यांचा आजार. याला 'जरादुरदृष्टी' किंवा 'वृद्धापकाळातील दुरदृष्टी' असेही म्हणतात. साधारणपणे ४० वर्षानंतर हा आजार दिसून येतो. यात डोळ्यातील लेन्स कमी लवचिक होत असल्याने जवळून पाहण्याची क्षणता कमी होते. लहान अक्षरे वाचतांना त्रास होतो, डोकेदुखी आणि डोळ्यांवर ताण येतो. तज्ञ डॉक्टरद्वारे डोळ्यांची तपासणी आणि आवश्यक्तेप्रमाणे द्वि-फोकल चश्मा हा यावर उपाय आहे.

**डिसेंबरमध्ये कारंजातून होणार सुरुवात**

वर्धा जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातून डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात मोहिमेची सुरुवात होणार आहे. तालुक्यातील नेत्र सखी व आशांचे विशेष प्रशिक्षण नज फाऊंडेशनच्यावतीने घेतले जातील. त्यानंतर टप्प्याटप्पायने जिल्हाभर मोहिम राबविली जाणार आहे.

# जुगार अड्ड्यांवर पोलिसांचा छापा

## मटका चालक गजाआड !



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

मा. पोलीस अधीक्षक बीड व मा. अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली केज शहरात अवैध जुगार व्यवसायावर पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन वेगवेगळ्या ठिकाणी कल्याण मटका खेळणाऱ्यांना रंगेहाथ पकडले.दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या या कारवाईत श्री. वेंकटराम (भापोसे) यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोउपनि संजय फड, पोह/२०११ अशोक खेलबुडे, पोह/१५९८ उत्रेश्वर केदार व पोअं/२०९७ कुलदीप खंदारे यांच्या पथकाने वसुंधरा बँकेच्या मागील बंद खोलीवर छापा टाकला.

पहिल्या छाप्यात शिवराज भगवानराव पाटील (वय ४०, धारूर रोड, केज) व शेख शकील महेमुद (वय ४२, रोजा मोहल्ला, केज) हे दोघेही कल्याण मटका खेळताना रंगेहाथ पकडले. त्यांच्या ताब्यातून रु. ८९,९६०/- नगद, मोटरसायकल, मोबाईल तसेच जुगाराचे साहित्य असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी पोह/२१११ अशोक खेलबुडे यांच्या फिर्यादीवरून शिवराज पाटील, शेख शकील महेमुद, गणेश खराडे व शेख चंद सेठ (रा. केज) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या छाप्यात एकजन विनापरवाना बेकायदेशीर कल्याण मटका खेळताना मिळून आला. त्याच्याकडून रु. १६,३९०/- नगद, मोबाईल फोन व जुगाराचे साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोउपनि संजय फड यांच्या फिर्यादीवरून एकजनावर व गणेश खराडे (रा. केज) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक बीड, मा. अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. वेंकटराम (भा.पो.से.) यांच्या आदेशाने अंमलात आणली. पथकात पोउपनि संजय फड, पोह/२०११ अशोक खेलबुडे, पोह/१५९८ उत्रेश्वर केदार व पोअं/२०९७ कुलदीप खंदारे यांनी विशेष मेहनत घेतली. पोलिसांच्या या धडक मोहिमेमुळे अवैध धंदेविरोधात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आणखी कारवाया करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

# केज शहरात रिफ्लेक्टर शिवाय धावणाऱ्या उसाच्या गाड्यांनी वाढवला अपघातांचा धोका; केजकरांची सुरक्षा धोक्यात

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील गंगा माऊलीशुगर उमरी आणि येडेश्वरी साखर कारखाना आनंदगाव या दोन साखर कारखान्यांचा ऊस वाहतूक करणारी वाहने सध्या केज शहरातून मोठ्या प्रमाणावर धावू लागली आहेत.या वाहनांवर आवश्यक रिफ्लेक्टर व मागील प्रकाशयंत्र (लाईट) नसल्याने रात्रीच्या वेळी या वाहनांचा अंदाज न आल्यामुळे अपघात होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे,केज शहरातून दोन राज्य महामार्ग जात असल्याने दिवसरात्र वाहनांची मोठी वर्दळ असते.अशा परिस्थितीत साखर कारखान्यांच्या ट्रॅक्टर - ट्रॉली आणि ट्रक यांच्या बेपर्वा वाहतुकीमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.मागील वर्षी अशाच उसाच्या वाहनांच्या धडकेत अनेक अपघात झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. काही ठिकाणी तर गंभीर जखमी आणि मृत्यूंच्याही घटना नोंदल्या गेल्या आहेत.मात्र,त्यानंतरही संबंधित साखर कारखान्यांनी आणि वाहतूकदारांनी यासंदर्भात कोणतीही ठोस खबरदारी घेतलेली नाही,अशी नागरिकांची तक्रार आहे.

अनेक नागरिकांनी सांगितले की,रात्रीच्या वेळी ऊस घेऊनजाणाऱ्या ट्रॉलींना रेफ्लेक्टर दिसत नाहीत,काही वाहनांच्या मागील दिवे बंद असतात. त्यामुळे मागून येणाऱ्या वाहनचालकांना ती वाहने नजरेस पडत नाहीत आणि अपघात घडण्याची शक्यता वाढते.तसेच ट्रॅक्टर चालकांनी लावलेल्या मोठ्या आवाजात गाणी वाजवत असल्याबाबत ही कारवाई होणे गरजेचे आहे.या बाबत नागरिकांनी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापनाकडे आणि वाहतूक विभागाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. अपघात टाळण्यासाठी ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांवर रिफ्लेक्टर, मागील दिवे आणि ओव्हर लोड नियंत्रण यांची सक्ती करावी,तसेच गाणीमोठ्या आवाजात लावण्यावर पायबंद घालावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.केज तालुक्या तील या परिस्थितीकडे संबंधित विभागांनी लक्ष देऊन नागरिकांचा जीव धोक्यात न आणता सुरक्षित वाहतूक व्यवस्था निर्माण करावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अ‍ॅड.संज्योत जयपाल लाहोटी यांची वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बैंक लि.विधी सल्लागार पॅनेलवर नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**



परळी येथील नामांकित जयपाल लाहोटी यांचे चिरंजीव वकील अ‍ॅड. संज्योत जयपाल लाहोटी यांची वैद्यनाथ अर्बन को- ऑप. बैंक लि. यांच्या विधी सल्लागार पॅनेलवर नुकतीच नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्तीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अ‍ॅड. लाहोटी या गेल्या अनेक वर्षांपासून न्यायालयीन कार्यात सक्रिय असून विविध सामाजिक संस्थांमध्येही त्या कार्यरत आहेत. त्यांच्या कायदेशीर अनुभव, सचोटी व कामातील काटेकोरपणा लक्षात घेऊन ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.वैद्यनाथ अर्बन को- ऑप. बैंक लि. ही मराठवाड्यातील एक प्रतिष्ठित वित्तीय संस्था असून, बँकेच्या विधी सल्लागार पॅनेलवर अ‍ॅड. लाहोटी यांची निवड ही पारळी शहरासाठी अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

या नियुक्तीबद्दल व्यापारी, सामाजिक संस्था तसेच नागरिकांनी अ‍ॅड. संज्योत लाहोटी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# कृषि विज्ञान केंद्र दहिगाव-ने येथे कृषि विस्तार अधिकारी प्रशिक्षण

दैनिक वादळ वार्ता
**नेवासा । प्रतिनिधी**




शेतीमधील विविध तंत्रज्ञान प्रचार आणि प्रसार मध्ये कृषि विस्तार अधिकारी यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. त्यासाठी त्यांना शेतीमधील नव नवीन तंत्रज्ञान विषयी चे प्रशिक्षण देणे हा एक कृषि विज्ञान केंद्राचा उद्देश आहे. याचाच एक भाग म्हणून कृषि विस्तार अधिकारी यांच्यासाठी रब्बी हंगामातील महत्वाची पिके जसे गहू, हरभरा आणि ऊस पिक एकात्मिक उत्पादन तंत्रज्ञान या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.या प्रशिक्षात कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. श्यामसुंदर कौशिक यांनी गहू पिकातील आधुनिक तंत्रज्ञान जसे वेळेवर पेरणी, योग्य गहू वाणांचा वापर, अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि तण नियंत्रण या विषयी मार्गदर्शन केले. श्री माणिक विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण) यांनी गहू, हरभरा आणि ऊस पिकातील किड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. इंजि. राहुल पाटील, विषय विशेषज्ञ (कृषि अभियांत्रिकी) यांनी रब्बी हंगामातील पिकांमध्ये विविध औजारे जसे ऊस लागवड यंत्र, मका टोकन यंत्र, बिज प्रक्रिया यंत्र, रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र इ. औजारांचा वापर या विषयी मार्गदर्शन केले. नारायण निबे, विषय विशेषज्ञ (कृषि विद्या) यांनी हरभरा आणि ऊस पिक एकात्मिक उत्पादन तंत्रज्ञान या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना सचिन बडधे तर आभार प्रकाश बहिरट यांनी मानले. कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाकडून उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मंत्रालय आणि वार्ताहर संघाच्यावतीने पत्रकारिता क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरवण्यात येते.सन २०२५च्या उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारा करिता आपली नामांकने व शिफारशी येत्या २६ नोव्हेंबर २०२५ पूर्वी पुढील पत्त्यावर पाठवावीत,असे आवाहन मंत्रालय आणिविधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने करण्यात आले आहेत.

१) जीवनगौरव पुरस्कार - (राज्यस्तरीय)- एक,
२) उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (राज्यस्तरीय ) - वृत्तपत्र प्रतिनिधी- एक, वृत्तवाहिनी माध्यम प्रतिनिधी पुरस्कार -एक, आणि
३) उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (केवळ मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सदस्यांकरिता) एक,अशा एकूण चार पुरस्कारांचा समावेश आहे.

**१) कृ.पां.सामक जीवनगौरव पुरस्कार**

जेष्ठ पत्रकारांचे पत्रकारितेतील योगदान किमान २५ वर्षे असावे. त्यांचे वय ६० वर्षे पूर्ण असावे.पत्रकाराने राज्यस्तरावर पत्रकारिता क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य पाहूनपुरस्कारासाठी निवड केली जाईल.तसेच राज्यातील पत्रकार, विविध पत्रकार संघटना व अन्य मान्यवर व्यक्ती यांच्या शिफारशीही विचारात घेण्यात येतील.

**२) राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (दोन)**

सदर पुरस्कार वृत्तपत्र प्रतिनिधी व वृत्तवाहिनी माध्यम प्रतिनिधी यांना प्रत्येकी एक याप्रमाणे देण्यात येतो.पत्रकारितेत पूर्णवेळ सेवा बंधनकारक आहे.यामध्ये पत्रकारांना भाषेचे बंधन राहणार नाही.वृत्तपत्र माध्यम प्रतिनिधीना मागील दोन वर्षाच्या बातम्या/लेख यांची कात्रणे,तर वृत्तवाहिनी माध्यम प्रतिनिधीना चित्रफित/ध्वनीफित




(पेनड्राईव्ह) देणे बंधनकारक राहील. यावर अर्जदारांचे नाव तसेच संपादक किंवा संस्थेचे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून प्रवेशिका सांक्षाकित केलेली असावी.

**३) उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार (एक)**

या पुरस्कारासाठी केवळ मंत्रालय आणिविधिमंडळ वार्ताहर संघाच्या सदस्यांनाच सहभाग घेता येईल.अर्जदाराने दि.०१ जानेवारी २०२५ पासून ते अर्ज करण्याच्या दिनांका पर्यत कात्रणे/ध्वनीफित/चित्रफीतसह प्रवेशिका द्याव्यात.पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पत्रकारांनी आपल्या नामांकनाच्या प्रवेशिका अन्यथा मान्यवरांच्या शिफारशी तपशीलवार माहितीसह पुढील पत्त्यावर येत्या दि.२५ डिसेंबर २०२५ पर्यत पाठवण्यात याव्यात.चारही पुरस्कार निवडताना पुरस्कार निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. प्रवेशिका पाठविण्याचा पत्ता मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, तळमजला,पत्रकार कक्ष, मंत्रालय,मुंबई ४०००३२ किंवा mahamantralayagmail.com असे आवाहन मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीपराव सपाटे,सरचिटणीस दीपकजी भातुसे यांनी केले आहे.

# बिबट्यांच्या हल्ल्यांना प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा नियोजनातून ८ कोटी १३ लाखांचा निधी-पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन व विकास समितीतून ८ कोटी १३ लाख ४४ हजार रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.बिबट्यांच्या वाढत्या हालचालींचा विचार करून पालकमंत्र्यांनी मागील दोन दिवसांपासून जिल्हाधिकारी व वन विभागाशी सतत संपर्क ठेवत परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी चर्चा करून जिल्ह्यास आवश्यक अतिरिक्त यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याबाबत सूचित केले.उपलब्ध निधीतून ३०० पिंजरे, ३०० ट्रॅप कॅमेरे, तसेच जॅकेट, शूज, टॉर्च गन्स आणि संरक्षणात्मक किट यांसारखी रेस्क्यू उपकरणे खरेदी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय २२ रेस्क्यू वाहने तातडीने खरेदी करण्यासही प्रशासनास सांगण्यात आले आहे.जिल्ह्यात ११५० बिबटे असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांना पकडण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यास सांगितले असून पकडलेले बिबटे वनतारा येथे स्थलांतरित करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेण्यात आला आहे. या कार्यवाहीची अंमलबजावणी त्वरित करण्याचे निर्देशही देण्यात आले.तालुकानिहाय परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशा जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती बालदिन उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू जयंती अर्थात बालदिन बालग्रंथ प्रदर्शन,बाल ग्रंथवाचन, व्याख्यान,बाल मेळावा आदी सांस्कृतिककार्यक्रम घेवून साजरा करण्यात आला.सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून बालगोपालांच्या हस्ते पुजन व वंदन करण्यात आले.सर्वप्रथम बाल वाचकांसाठी सकाळी ८ ते दुपारी ५ या वेळात आयोजित केलेल्या बालग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

सकाळी ९ ते १० या वेळात बाल वाचकांनी ग्रंथवाचन केले.त्यानंतर बालमेळावा घेण्यात आला.या बालमेळाव्यात अंगणवाडी कार्यकर्ती सौ. जयश्री सिताराम वैरागे, मदतनीस सौ.शिवकन्या गायकवाड,संजय सोनवणे,आनंद भैय्या गायकवाड,रविंद्र गायकवाड यांनीमार्गदर्शन केले.यावेळी मार्गदर्शन करताना अंगणवाडी कार्यकर्ती सौ.जयश्रीवैरागे यांनी बालक - बालिका यांना वाचनाचे वेड लागावे अशी भावना व्यक्तकरून स्वानंद सार्वजनिक वाचनालयात बाल साहित्याचा खजिना असून बाल वाचकांनी नियमित वाचन करावे असे आवाहन केले.तसेच स्वानंद सार्वजनिक वाचनालय नियमितपणे बालवाचक,वाचकांना प्रोत्साहन देत आहे तसेच मोफत वाचन सेवा देत आहे,यामुळे बालवाचक, विद्यार्थी,युवक,जेष्ठ नागरिक,महिला म्हणजेच गांवातील सर्व घटकां साठी,लहानांपासून मोठ्या पर्यंत सर्वांनाच मोफत सेवा देत आहे,ही गांवाच्या सर्वांगीण विकासाला चालनादेणारी बाब असल्याचे प्रतिपादन केले.प्रत्येक घटकातील वाचकांचा बौद्धीक, मानसीक विकास व्हावा ज्यामुळे शारीरीक, आर्थिक,सांस्कृतिक विकास होईल यासाठी १९९७ पासून ग्रंथालयाचे




संस्थापक अध्यक्ष डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे वाचक सभासदाकडून एक रुपाचीही फीस न घेता,स्वतः सर्व वाचकांची वार्षीक वर्गणी भरून वाचक मोफतसेवा देतात. याचा जास्तीत जास्त वाचकांनी कायदा घ्यावा असे आवाहन या बाल मेळाव्यात सौ.जयश्री सिताराम वैरागे यांनी केले.यावेळी शिवकन्या गायकवाड,निलावती पोळ,संजय सोनवणे, रविंद्र गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड यांनीही मार्गदर्शन केले.बालग्रंथ वाचन,बालग्रंथ प्रदर्शन व बाल मेळावा कार्यक्रमात कु.महेश्वरी महेश गायकवाड,समिक्षा सतीश गायकवाड, शिवानी सतीश गायकवाड,स्वरा निलेश गायकवाड,दिग्विजय रामेश्वरगायकवाड,श्रीपदा संतोष गायकवाड,वेदिका भारत घोगले,धनश्री बालाजी गायकवाड,श्रेया दत्तात्रय गायकवाड,गुरु प्रसाद अमोल गायकवाड, जान्हवी दिपक पुरी, शिवमल्हार कृष्णा गायकवाड यांनी ग्रंथ प्रदर्शन,बाल ग्रंथवाचन, बालमेळावा आदी सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला. त्यानंतर ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांचे छोटेखानी व्याख्यान झाले.त्यांनी बालकांचे चाचा नेहरू यांच्या व्यक्तीमत्वावर प्रकाश टाकला.तसेच बाल वाचकांना बालपणापासून वाचनाची सवय लागावी म्हणून वाचाल तर वाचाल असे सांगून काहीही वाचा पण वाचा हे वाचनाची नियमीत सवय लागण्या साठी आणि आयुष्याला दिशा देण्यासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते,प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी थोडक्यात अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन बाबासाहेब गायकवाड यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077